# प्रेस नोट

दि. 16/1/2025 रोजी, मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर, यांचे मार्गदर्शनात श्री. सागर पटील , पोलीस उपायुक्त परि-१, अमरावती शहर , यांचे अध्यक्षतेखाली श्री. कैलास पुंडकर सहा. पोलीस आयुक्त ,फ्रेजरपुरा विभाग ,अमरावती शहर , श्री. महेंद्र अँभोरे पोलीस निरीक्षक पो. स्टे. नांदगाव पेठ यांनी नांदगाव पेठ एम. आय. डी. सी. मधिल वस्त्रोद्योग समुह , लघुउद्योग , व शासनाचे अधिकारी यांची नांदगाव पेठ एम.आय.डी.सी. येथे समन्वय बैठक घेण्यात आली. बैठकीकरीता श्री. सुधिर अमृतकर, श्री. एच. जी राठोड -एम.आय.डी.सी. डेप्युटी ईंजीनीयर, श्रीमती पी. एम. गंपावार एम.आय.डी.सी. हेल्थ अँड सेफ्टी अधिकारी, श्री. ओ. एस. वाघमारे एम. आय. डी.सी. फायर विभाग, श्री. आकाश कांबळे लेबर ऑफीसर , श्री. पी. एम. महल्ले , MPCB फील्ड ऑफीसर, श्री.घनश्याम दंदे अन्न औषधी प्रशासन विभआग, , प्रदुषण नियंत्रण महामंडळ चे श्री.जी.डी. बेहरे अधिकरी, विज महावितरण चे अधिकारी , डॉं. सेनेहल राउत PHC माहुली, मेडीकल आंफीसर, व एम. आय. डी.सी मधिल कंपनीचे प्लांट हेड व एच आर मॅनेजर तसेच लघुउद्योग समुहाचे अध्यक्ष हे हजर होते.

बैठकीमध्ये एम. आय. डी. चे प्लांट हेड व एच आर मॅनेजर यांचे सोबत शासनाचे सर्व अधिकारी यांनी विस्तृत चर्चा केली, कंपनीच्या अडिअडचणी जाणुन घेण्यात आल्या. कंपनी मधिल महिला कामगार यांचे सुरक्षे संबंधाने उपाय योजना कराव्यात. अग्निपासुन सुरक्षा करीता कंपनीचे फायर ऑडीट नियमीत करावे .तसेच कामगारांचे ,महिला कामगारांचे वेलफेयर पहावे याबाबत कामागार कार्यालयाचे अधिकरी यांनी सुचना दिल्या. कंपनीध्ये कोणतीही कामगार किंवा सुरक्षे संबंधाने घटना घडली तर कंपनीचे प्लांट हेड यांनी घटनेचे गांभीर्य ओळखुन कंपनीशी संबंधित सरकारी यंत्रणेला तात्काळ घटने बाबत माहीती द्यावी. जणे करुन आपणास तात्काळ मदत करणे सोईचे होईल. बाहेरील कोणीही व्यक्ती कंपनीमध्ये येवुन गुंडागर्दी करुन, धमकावीत असेल, कंपनीचे कामकाजामध्ये कोणी बाधा निर्माण करत असेल, खंडणी मागत असेल तर पोलीस स्टेशनला रितसर तक्रार नोंदवावी अशा लोकांविरुध्द प्रचलीत कायद्यानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल . प्रत्येकांनी समन्वय ठेवावा अशा सुचना देण्यात आल्या. अशा प्रकारे समन्वय बैठक घेण्यात आली.

Scanned with OKEN Scanner